# प्रेसनोट दि.१२/०६/२०१९

## ०९ वर्षापासून पोलीसांना गुंगारा देणारा चंदन चोर युनिट -०४ पोलीसांच्या जाळयात.

दि. ११/०५/२०१० रोजी टाटा मॅनेजमेंट ट्रेनिंग सेंटर, मंगलदास रोड,पुणे येथून चंदनाची एकुण ०३ झाडे तोडून नेल्याबाबत बंडगार्डन पो स्टे येथे २०७/२०१० भादवि क ३७९,३४,४११ प्रमाणे गुन्हा दाखल होता. या गुन्हयात यापुर्वी **१**. कजन ऊर्फ जुर्मेश फुटेल **२**. सनद मोहमदलाल राठोड **३**. सोनदलाल भावश्या पठार रा. सर्व खंडवा,मध्यप्रदेश यांना अटक करण्यात आली होती परंतू सदर गुन्हयात अनिल तानाजी जाधव हा पोलीसांना ०९ वर्षापासून गुंगारा देत होता.

युनिट ०४,गुन्हे शाखा,पुणे शहर कडील पोलीस कर्मचारी सचिन ढवळे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली, वरील गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी अनिल तानाजी जाधव हा फलटण येथे असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली. त्याप्रमाणे वरिष्ठांच्या आदेशानुसार युनिट -०४,गुन्हे शाखेकडील सपोफौ शंकर पाटील, गणेश साळुंखे, सचिन ढवळे राकेश खणवे असे मु.पो. सुरवडी ता. फलटण, जि सातारा येथे जावून सापळा लावला असता, आम्हास अनिल जाधव हा मिळून आला. त्यास ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अनिल तानाजी जाधव, वय ४१ वर्षे, रा. मु.पो. सुरवडी ता. फलटण, जि सातारा असे असल्याचे सांगितले व वरील गुन्हा केला असल्याचे कबुल केल्याने त्यास पुढील कार्यवाही करता बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरचा आरोपी हा स-हाईत असून, त्याचे विरुध्द यापुर्वी चंदनचोरीचे विमानतळ, खडक, सांगवी, कोरेगाव (सातारा), श्रीगोंदा, फलटण ग्रामीण येथे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त, श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे, सहा पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी सचिन ढवळे, शंकर पाटील, गणेश साळुंखे, राकेश खुणवे यांनी केली आहे.

दि. १२/०६/२०१९

(अंजुम बागवान)
पोलीस निरीक्षक
युनिट ४,गुन्हे शाखा,पुणे शहर